**रे.मु.नं.१५७/२०१४**

## आदेश निशाणी क्र. ३३ वरील

१. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.५ यांनी त्यांचेविरुध्द झालेला दावा एकतर्फाचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत स्वीकारणेसाठी केला आहे.

२. प्रतिवादी क्र.५ सांगतात, त्या महिला असून अर्धशिक्षीत आहेत. त्यांना कायदयाची फारशी माहिती नाही. त्यामुळे कागदपत्रे काढणे, विधीज्ञ नेमणे, कैफीयत देणे हे मुदतीत शक्य झाले नाही. प्रस्तुतचा दावा स्थावर मिळकती संदर्भातील आहे. दाव्याचे कामकाज चालविताना या प्रतिवादींचीही कैफीयत असणे गरजेचे आहे. तसे न झाल्यास या प्रतिवादींचे हक्कांवर गदा येवून त्यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तरी झालेला आदेश रदद होवून व झालेला उशीर माफ होवून कैफीयत अभिलेखावर घेणेसाठी हा अर्ज.

३. यातील वादींनी अर्जास म्हणणे देवून आक्षेप नोंदविला आहे. ते सांगतात अर्जातील कारण खरे नाही. या प्रतिवादींनी जाणीवपूर्वक कामकाज लांबविण्याच्या उददेशाने प्रस्तुतचा अर्ज उशीराने दिलेला आहे. तरी तो नामंजूर करावा.

४. प्रतिवादी क्र. ५ व वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा वाटप, पृथक कब्जा व जाहीरीकरणासाठी आहे. या प्रतिवादींच्या कथनानुसार त्या अर्धशिक्षीत आहेत, वेळेत कागदपत्रे काढली नाहीत, विधीज्ञांची नेमणूक करता आली नाही, या सर्व कारणांमुळे त्यांना याकामी हजर राहून वेळेत कैफीयत देता आली नाही, असे त्या सांगतात.

६. प्रतिवादी क्र.५ यांना समन्सची योग्य त–हेने बजावणी झाल्याचे दिसते. म्हणजेच या प्रतिवादींना दाव्याबद्दल ज्ञान (knowledge) होते. त्यानंतर दिनांक

३०.०६.२०१५ रोजी दावा एकतर्फा चालवणेचा आदेश झाला आहे तर दिनांक १७.०२.२०१७ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. समन्स लागू झाले ती तारीख, एकतर्फा आदेश पारीत केल्याची तारीख व प्रस्तुतचा अर्ज तारीख पाहता झालेला आदेश रद्द करुन मिळणेसाठी प्रतिवादींनी उशीर केल्याचे दिसते. प्रतिवादींचे कथनानुसार त्यांना कैफीयत दाखल करणेस २० महिन्यांचा उशीर झालेला आहे.

७. प्रतिवादीने नमूद केलेली कारणे पाहता ती कारणे दाव्याचेकामी गैरहजर राहणेस उचीत कारणे नाहीत. दावा स्थावर मिळकतीसंदर्भात आहे. या प्रतिवादींनी दिलेली कारणे संयुक्तिक वाटत नाहीत, परंतु दाव्याचे स्वरुप पाहता केवळ त्या कारणांवरुन या प्रतिवादींना संधी नाकारणे न्यायोचित होणार नाही.

८. या प्रतिवादींना संधी देण्याने दाव्याचा गुणावगुणावर अंतिमतः निर्णय होणेकामी मदतच होईल. प्रतिवादींना संधी नाकारण्याने दाव्याचे कामी गुंतागुंत निर्माण होईल, तसेच भविष्यात मिळकतीच्या अनुषंगाने बहुविध प्रकरणे निर्माण होतील ही शक्यता टाळता येईल. प्रस्तुत अर्जामुळे दाव्याचे कामी विलंब झाला आहे तसेच दावा आधीचे स्थितीस जाणार आहे. याचा विचार करता खर्चाची रक्कम या प्रतिवादींवर लादणे योग्य होईल.

९. सबब, वरील चर्चेचा विचार करता अंतिम न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र. ५ यांचा निशाणी क्र.३३ चा अर्ज रु.१,०००/– च्या खर्चावर मंजूर करुन त्यांचेविरुध्द झालेला दावा एकतर्फाचा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत दाखल करण्यास परवानगी देत आहे. खर्चाच्या रक्कमेपैकी रु.२००/–विधी सेवा केंद्रात जमा करावी तर उर्वरित रु.८००/– वादींना देण्यात यावेत.

. (कु.एल.एच.जाधव )

दिनांक : १७/०८/२०१७ २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मोहोळ

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | H.J.Mane. |
| Court | : | 2ndJt. Civil Judge Jr. Division Mohol. |
| Date | : | 17/08/2017 |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 17/08/2017 |
| Judgment/order uploaded on | : | 19/08/2017 |